Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18844689

# डिजिटल इंडिया आणि प्रशासनातील पारदर्शकता : लोकप्रशासनाचा दृष्टिकोन

डॉ. भगवानसिंग एम. राजपुत[1] & अनिता सुकलाल चव्हाण[2]

**सारांश :-**

डिजिटल तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे सार्वजनिक प्रशासनाच्या कार्य पद्धतीत लक्षणीय परिवर्तन घडून आले आहे. भारत सरकारने 2015 मध्ये सुरु केलेल्या डिजिटल इंडिया उपक्रमाचा प्रमुख उद्देश प्रशासन अधिक पारदर्शक, उत्तरदायी, कार्यक्रम व नागरिकाभिमुख बनवणे हा आहे. पारंपारिक प्रशासन व्यवस्थेत माहितीचा अपूरा प्रसार, प्रक्रियात्मक विलंब आणि भ्रष्टाचार यासारख्या समस्या आढळतात. डिजिटल इंडिया अंतर्गत ई-प्रशासन, ऑनलाईन सेवा वितरण, डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर (DBT), ओपन गव्हर्नमेंट डेटा (OGD) यासारख्या उपक्रमांमुळे प्रशासनातील पारदर्शकता वाढवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधन लेखात डिजिटल इंडिया आणि प्रशासनातील पारदर्शकता यांच्यातील संबंधाचा लोकप्रशासनाच्या दृष्टीकोनातून संकल्पनात्मक अभ्यास करण्यात आला आहे. या लेखातून डिजिटल प्रशासन हे सुशासन साध्य करण्याचे प्रभावी साधन असल्याचे स्पष्ट होते.

**की वर्डस् :-** डिजिटल इंडिया, ई-शासन, पारदर्शकता, उत्तरदायित्व, सार्वजनिक प्रशासन, सुशासन

**प्रस्तावना :-**

लोकशाही शासन व्यवस्थेत लोकप्रशासनाची भूमिका अत्यंत महत्वाची असते. प्रशासनाची कार्यत्मकता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यावरच नागरिकांचा शासनावरील विश्वास अवलंबून असतो. पारंपारिक प्रशासकीय व्यवस्थेत कागदोपत्री प्रक्रिया, जटिल नियम, माहितीचा अभाव आणि भ्रष्टाचार यामुळे प्रशासन आणि नागरिक यांच्यातील अंतर वाढलेले दिसून येते.

या पार्श्वभूमीवर माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाचा (ICT) वापर करुन प्रशासन अधिक खुले, वेगवान आणि उत्तरदायी बनवण्याच्या उद्देशाने डिजिटल इंडिया उपक्रम सुरु करण्यात आला आहे. डिजिटल इंडिया केवळ तांत्रिक परिवर्तन नसून प्रशासनाच्या संपूर्ण दृष्टीकोनातील बदल दर्शविते.

[1] मार्गदर्शक, लोकप्रशासन विभाग, एमएसएस कला महाविद्यालय तिर्थपुरी, जि.जालना.

[2] संशोधक विद्यार्थीनी लोकप्रशासन विभाग, विवेकानंद कला, सरदार दलिपसिंग, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर.

**डिजिटल इंडिया : संकल्पना व उद्दिष्ट्ये :-**

डिजिटल इंडिया हा भारत सरकारचा महत्वाकांक्षी कार्यक्रम असून त्याचा उद्देश भारताला डिजिटलदृष्ट्या सक्षम समाज आणि ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्था बनवणे हा आहे. डिजिटल इंडियाची प्रमुख उद्दिष्टये पुढीलप्रमाणे आहेत.

1. शासन सेवा डिजिटल माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहोचवणे.
2. प्रशासकीय प्रक्रिया सुलभ, पारदर्शक व उत्तरदायी बनवणे.
3. माहितीचा मुक्त आणि सुलभ प्रवाह सुनिश्चित करणे.
4. भ्रष्टाचारावर नियंत्रण मिळवणे.
5. नागरिकांचा प्रशासनातील सहभाग वाढवणे.

**डिजिटल भारत आणि पारदर्शकता :-**

**प्रशासनातील पारदर्शकता :-**

पारदर्शकता म्हणजे शासनाच्या निर्णय प्रक्रिया, धोरणे, आर्थिक व्यवहार आणि प्रशासकीय कृती नागरिकांसाठी खुल्या आणि समजण्यासारख्या असणे, लोकप्रशासनाच्या अभ्यासात पारदर्शकता ही लोकशाही मूल्य म्हणून मानली जाते.

Bovens यांच्या मते पारदर्शकता ही उत्तरदायित्वाची मुलभूत अट आहे. माहिती उपलब्ध झाल्याशिवाय प्रशासनाकडून जबाबदारी निश्चित करणे शक्य होत नाही.

**डिजिटल इंडिया आणि प्रशासनातील पारदर्शकतेचा संबंध :-**

1) **ई-शासन आणि माहितीची उपलब्धता :-**
ई-शासनामुळे शासकीय माहिती वेबसाईटस्, पोर्टल्स आणि मोबाईल ॲपस् द्वारे नागरिकांसाठी सहज उपलब्ध झाली आहे. त्यामुळे प्रशासनातील गुप्तता कमी होऊन माहितीचा खुला प्रवाह वाढला आहे.

2) **ऑनलाईन सेवा वितरण :-**
ऑनलाईन सेवा (जन्म-मृत्यू नोंदणी प्रमाणपत्रे, परवाने) यामुळे Face to Face संपर्क कमी झाला असून दलाली व भ्रष्टाचारावर नियंत्रण आले आहे.

**डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर (DBT) :-**

DBT प्रणालीमुळे अनुदाने थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होतात. यामुळे मध्यस्थांची भूमिका कमी होऊन आर्थिक पारदर्शकता वाढती आहे.

3) **ओपन गव्हर्नमेंट डेटा :-**

ओपन डेटा पोर्टलमुळे शासनाचा डेटा संशोधक, माध्यमे आणि नागरिकांसाठी खुला झाला आहे. यामुळे प्रशासनाच्या कार्य प्रदर्शनाचे मूल्यमापन शक्य झाले आहे.

4) **डिजिटल प्रशासन आणि उत्तरदायित्व :-**

डिजिटल साधनांमुळे प्रशासन अधिक उत्तरदायी बनते. ऑनलाईन तक्रार निवारण प्रणाली, सेवा ट्रेकींग व्यवस्था आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्म यांच्या माध्यमातून नागरिक प्रशासनावर थेट देखरेख ठेवू शकतात. त्यामुळे प्रशासनाला वेळेत आणि जबाबदारीने प्रतिसाद देणे भाग पडते.

5) **संकल्पनात्मक चौकट :-**

**डिजिटल इंडिया उपक्रम**

(ई-गव्हर्नन्स, डीबीटी, ओपन डेटा, ऑनलाईन पोर्टल्स, डिजिटल प्लॅटफॉर्म)

↓

डिजिटल प्रशासन

(आयसीटी-सक्षम प्रक्रिया)

↓

प्रशासकीय पारदर्शकता

(माहिती उपलब्धता, मोकळेपणा, कमी विवेक)

↓

प्रशासकीय जबाबदारी

(उत्तरक्षमता, देखरेख, नागरिक देखरेख)

↓

सुशासन

(कार्यक्षमता, प्रतिसाद, नागरिक विश्वास)

वरील आकृतीवरुन असे स्पष्ट होते की, Digital India Initiatives हे भारतीय प्रशासनात डिजिटल प्रशासनाचा पाया निर्माण करतात. ई-शासन, DBT, ओपन डेटा पोर्टल्स आणि ऑनलाईन सेवा वितरण यामुळे प्रशासकीय प्रक्रिया अधिक पारदर्शक बनतात. ही वाढलेली पारदर्शकता उत्तरदायित्वाला बळकटी देते. कारण निर्णय प्रक्रिया व संसाधनांचा वापर नागरिकांसाठी अधिक खुला होतो. परिणामी प्रशासनाची कार्यक्षमता, उत्तरदायित्व आणि नागरिकांचा विश्वास वाढून सुशासन साध्य होते. ही चौकट लोकप्रशासनातील Digital Era Governance आणि New Public Service या सैद्धांतिक प्रवाहाशी सुसंगत आहे.

**गृहितके / परिकल्पना :-**

1. डिजिटल इंडिया उपक्रमामुळे भारतीय प्रशासनातील पारदर्शकता वाढते.

2. ई-शासनामुळे प्रशासन अधिक उत्तरदायी बनते.
3. डिजीटल सेवा वितरणामुळे भ्रष्टाचाराच्या संधी कमी होतात.
4. डिजीटल प्रशासन आणि सुशासन यांच्यात सकारात्मक संबंध आहे.

**डिजिटल इंडिया उपक्रमातील आव्हाने :-**

डिजिटल इंडिया उपक्रम यशस्वी असला तरी काही आव्हाने कायम आहेत.

1. डिजिटल दरी (ग्रामीण - शहरी, श्रीमंत - गरीब)
2. सायबर सुरक्षा आणि डेटा गोपनियता
3. तांत्रिक साक्षरतेचा अभाव
4. प्रशासकीय मानसिकतेतील बदलांचा अभाव
5. पायाभूत सुविधांची कमतरता

**सुशासनाच्या दृष्टीने डिजिटल इंडिया :-** डिजिटल इंडिया उपक्रमामुळे सुशासनाचे मुख्य घटक म्हणजे पारदर्शकता, उत्तरदायित्व, सहभाग आणि कार्यक्षमता, डिजिटल इंडिया या सर्व घटकांना बळकटी देतो. त्यामुळे डिजिटल प्रशासन हे आधुनिक लोकप्रशासनाचे अपरिहार्य अंग बनले आहे.

**निष्कर्ष :-** डिजिटल प्रशासन हे सुशासन साध्य करण्याचे प्रभावी साधन ठरु शकते. तथापि, डिजिटल दरी आणि सायबर सुरक्षेच्या आव्हानांवर मात केल्यास डिजिटल इंडिया उपक्रमाचा प्रभाव अधिक व्यापक होईल.

**संदर्भ :-**

1. Borens, M., 2007, Analysing and Assessing Accountability, A Conceptual Framwork, European Law Journal, 13 (4), PP. 447-468
2. Heeks, R., 2006, Implementing and Managing Government, New Delhi: SAGE Publications.
3. Government of India, 2015, Digital India: Power to Empower, New Delhi, Ministry of Electronics and Information Technology.
4. World Bank, 2016, World Development Report 2016: Digital Dividends, Washington DC, World Bank.
5. OECD, 2018, Digital Governemnt : Review of India, Paris, OECD Publishing.

**Publisher's Note:** *The views and opinions expressed in this article are solely those of the author(s) and do not necessarily reflect those of the publisher, editors, or the editorial board.*